डॉ. अविनाश ढाकणे, भाप्रसे
सदस्य सचिव

Dr. Avinash Dhakne, IAS
Member Secretary

MAHARASHTRA
"Your Service is our Duty"

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

जा.क्र-मप्रनि/प्रा.अ.जै.वै.क/ब-४२ दिनांक : ०७/०२/२०२५

## कार्यालयीन आदेश

**विषय** : एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातुन सुसुत्रता आणण्याबाबत...

महाराष्ट्र विघटनशिल व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम ४ ची पोटकलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसुचना, २०१८ अधिसुचित केलेली आहे. सदर अधिसूचना म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाद्वारे दिनांक १२/०८/२०२१ च्या अधिसुचनेद्वारे एकल वापर प्लॉस्टिक (Single Use Plastic) च्या वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे.

महराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ च्या कलम ४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांतर्गत शासनाच्या विविध विभागांना कारवाई करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. यामध्ये म.प्र.नि. मंडळाच्या प्रादेशिक अधिकारी, उप-प्रादेशिक अधिकारी, क्षेत्र अधिकारी यांचा सुध्दा समावेश आहे.

म.प्र.नि. मंडळाचे व मनपाचे अधिकारी सदर बाबत दरवेळी संयुक्त रितीने कारवाईचे नियोजन करतात. दरम्यान सदर दक्षता पथकातील अधिकाऱ्यांना एकत्रित येण्याकरीता जास्त वेळ जातो व कारवाई करण्यासाठी वेळ अपुरा पडतो. वरील बाबींचा विचार करता कारवाईच्या अनुषंगाने सुसुत्रता आणण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) ज्या ठिकाणी कारवाई करताना जर स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी यांना वेळ लागत असेल अथवा अनुपस्थित असतील तर म.प्र.नि. मंडळाचे अधिकारी स्वतंत्र रित्या कारवाई करतील. तसेच, चलान पुस्तिका (DR Book) सोबत घेऊन स्वतंत्र रित्या आस्थापनांना दंडाचे चलन निर्गमित करतील. चलानाची रक्कम लेखा शाखा अधिकारी यांच्याकडे जमा करण्यात यावी. तथापि, सदरील आस्थापनांनी दंडाची रक्कम भरण्यास नकार दर्शविल्यास आस्थापनांचे नाव, पत्ता व दुकान नोंदणी क्रमांक, सदरील आस्थापनाचे छायाचित्र जिओ टॅग (Geo Tag) सहीत सहाय्यक आयुक्त, स्थानिक स्वराज्य संस्था तथा निर्देशित अधिकारी यांना सदर आस्थापनेकडुन होणारे नियमांचे उल्लंघन व अपेक्षित कारवाईबाबतचे पत्र अग्रेषित करण्यात यावे.

२) तसेच, प्लास्टिकचे आवरण वापरणाऱ्या ब्रँड धारकावर कारवाई करताना त्यांच्या जवळ कंपोस्टेबल/ बायोडिग्रेडेबल एकल वापर प्लास्टिकचा वापर आढळुन आल्यास सदर प्लास्टिकच्या वस्तू बाबतचे केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळांचे कंपोस्टेबल/ प्रमाणपत्र असल्याची खातरजमा करण्यात यावी. तसेच,



कल्पतरु पॉईंट, शीव सर्कल, शीव (पूर्व), मुंबई - ४०० ०२२. (फो.: २४०१ ०७०६)
Kalpataru Point, Sion Circle, Sion (East), Mumbai - 400 022. (M. 2401 0706)
E-mail : ms@mpcb.gov.in • Website : www.mpcb.gov.in

वस्तूंवर क्यूआर (QR) कोड तपासण्यात यावा व सदरील वस्तू प्रमाणित असल्याची खातरजमा करावी. याबाबत सदरील आस्थापनांकडुन नियमांचे उल्लंघन आढळुन आल्यास प्रादेशिक अधिकारी यांनी सदर ब्रँड मालकाच्या मुख्यालयास केलेल्या कारवाईबाबत अवगत करण्यात यावे. तसेच सदर आस्थापनांविषयी सहाय्यक आयुक्त, स्थानिक स्वराज्य संस्था तथा निर्देशित अधिकारी यांना कारवाई करण्याबाबतचे पत्र अग्रेषित करण्यात यावे.

३) ब्रँड मालकावर तसेच आस्थापनांवर महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ प्रमाणे प्रादेशिक अधिकारी स्तरावर कारवाई करण्यात यावी. केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल मुख्यालयास सादर करण्यात यावा. त्याच प्रमाणे बंदी असलेले प्लास्टिक उत्पादने करणारे उद्योग, साठवणुक करणारी गोदामे, वितरक यांची माहिती सदर आस्थापनांकडुन कारवाई दरम्यान घ्यावी (Backward integration करावे) व संबंधीत प्रादेशिक अधिकारी यांना द्यावी. सदर प्रादेशिक अधिकारी यांनी दोषी उद्योग / गोदामे / वितरक यांच्यावर त्वरित कारवाई करावी.

४) तसेच, कारवाई दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार टाळण्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पोलीस प्रशासनाची मदत घेण्यात यावी व याबाबत प्रादेशिक अधिकारी स्तरावर सदरील कारवाई बाबतची सुचना संबंधीत पोलीस विभाग व त्यांच्या कार्यालयास अवगत करण्यात यावी.

सदर आदेशाचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

(डॉ. **अविनाश ढाकणे,** भा.प्र.से.)
सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**प्रत माहितीसाठी सादर :-**

१. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शीव, मुंबई.
२. मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महानगरपालिका मार्ग, मुंबई-४००००१.
३. मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, क्रॉफर्ड मार्केट, लोकमान्य टिळक रोड, पोलिस कॉलनी, धोबी तलाव, छत्रपती शिवाजी टर्मिनस, फोर्ट, मुंबई : - एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने संयुक्त कारवाईकरीता पोलीस प्रशासनाची मदत देण्यात यावी.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ : आपल्या कार्यक्षेत्रांतर्गत येणाऱ्या उप-प्रादेशिक अधिकारी व क्षेत्र अधिकारी यांना चलान पुस्तिका (DR Book) देण्यात यावीत व त्याच्या नोंदी जतन करण्यात याव्यात.
५. सर्व उप प्रादेशिक अधिकारी व क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ.